NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक ०९.११.२०२६ सोमवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक ०८.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये ०९ ईसमावर कारवाई करून एकुण ९,८७०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये १३ ईसमावर कारवाई करून एकुण १७,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. त्याचप्रमाणे, दिनांक ०८.११.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०९.११.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०३ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ३१ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १२७ मोवाका अन्वये २९ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये ३४ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ४१ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये १० केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०१ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ५८ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०२ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ०७ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०७ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ८५३ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये ०८ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १२ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,१२४ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ८३,३५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) राणा प्रतापनगर पोलीसांची कामगिरी :– हद्दपार ईसमास अटक.

दिनांक ०८.११.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, राणा प्रतापनगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, एक हद्दपार इसम नामे साहील हाथीबेड हा प्रज्ञाशील बुध्दविहार जवळील मैदानात उभा आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, तेथे गेले असता, त्यांना प्राप्त वर्णनाचा ईसम दिसुन आला. त्याचेजवळ जात असता तो पोलीसांना पाहुन पळु लागल्याने, त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव साहील राजेश हाथीबेंड, वय २२ वर्षे, रा. घर क्र. २३२, संत तुकडोजी नगर, सुभाषनगर, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे

हद्दपार आदेश क्र. ३८६७/२०२४ दिनांक २८.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तो समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. ऋषिकेश सिंगारेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १), मा. श्री. शिवाजी गायकवाड, सहा. पोलीस आयुक्त (सोनेगाव) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. पकंज बोंडसे, पोउपनि. स्वप्निल राऊत, पोहवा. संतोष सोनटक्के, विशेषकुमार व पोअं. अजय धुर्वे यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे बजाजनगर :– जिवे ठार मारणाऱ्या आरोपींविरुध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०९.११.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास, फिर्यादी अक्षय गंगाधर नौकरकर, वय ३१ वर्ष, रा. प्लॉट क्र. ३३, देवनगर, कॅपिटल जिमचे बाजुला, बजाजनगर नागपूर हे त्यांचा मित्र नामे अमन उर्फ बॉबी सुनिल सपाटे, वय २७ वर्ष, रा. प्लॉट क्र. १४, जयभोले सोसायटी, पिपळा फाटा, हुडकेश्वर, नागपूर याचेसह कारने त्यांचा मित्र नामे प्रसाद राऊत, रा. देवनगर, नागपूर यांचे वाढदिवसाकरीता जात असतांना, पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत देवनगर चौकातील ज्युस दुकानासमोर त्यांचे कारसमोर काही मुले फटाके फोडत असतांना, त्यांना कारचालक फिर्यादीचे मित्राने हकटले असता, याचा राग येवुन, फटाके फोडणारे आरोपी अक्षय मडावी व त्याचे २ ते ३ साथीदार यांनी फिर्यादीचे मित्रासोबत भांडण करुन व संगनमताने त्याचेजवळील चाकुने फिर्यादीचा मित्र नामे अमन उर्फ बॉबी याचे पोटावर वार करुन, त्यास गंभीर जखमी केले. जखमीस उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, त्यास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे आरोपीविरूध्द कलम १०३(१),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

२) पोलीस ठाणे अजनी :– शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ०९.११.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास, अंबाझरी पोलीसांचे पथक हे दिवाळी सणानिमीत्त विशेष मोहीमेदरम्यान पेट्रालींग करीत असतांना, त्यांना पोलीस ठाणे हद्दीत ८५ प्लॉट एरीया, हनुमान मंदीरजवळ स्पोर्टस् टिशर्ट व जिन्सपॅन्ट घातलेला एक इसम हातामध्ये धारदार शस्त्र घेऊन धुमाकूळ घालतांना दिसुन आला. त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव रोहीत उर्फ थापा अजय शर्मा, वय ३१ वर्षे, रा. रमा नगर, अयप्पा मंदीर जवळ, अजनी, नागपूर असे सांगीतले. त्याचे ताब्यातुन एक लोखंडी धारदार भाल्यासारखे टोकदार शस्त्र किंमती ५००/– रू. चा मुद्येमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आले.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने भाल्याचे टोकदार पाते बाळगुन धुमाकूळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा. शालिराम शेंडे यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे अजनी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे गिट्टीखदान :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०८.११.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, फिर्यादीची श्रीसाई सिक्युरिटी सर्व्हीसेस नावाचे सिक्युरिटी एजेन्सीमध्ये गार्ड म्हणुन काम करणारे इसम नामे नंदलाल अभिलाल सोनी, वय ५० वर्ष, रा. दुर्गा चौक, छिंदवाडा, मध्यप्रदेश, ह.मु. भिवसनखोरी, गिट्टीखदान हे अयोध्या अपार्टमेंट, दाभा येथील त्यांची डयुटी

पुर्ण करुन, आपले घरी पायदळ जात असतांना, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, दाभा रिंगरोड, व्हाईट हाऊस जवळ एका पल्सर मोटार सायकल क्र. एम.एच ४० सी.जे ९९२८ चा चालक नामे आकाश शत्रुघ्न बघेल, वय २८ वर्ष, रा. आंबेडकर नगर, आठवा मैल, वाडी, नागपूर याने त्याचे ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन पायी जाणाऱ्या नंदलाल सोनी यांना धडक देवुन गंभीर जखमी केले. अपघातामध्ये दुचाकी चालक व त्याचे मागे बसलेली त्याची पत्नी हे सुध्दा खाली पडुन जखमी झाले. तिन्ही जखमी यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, नंदलाल सोनी यांना डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. दुचाकी चालक आरोपी आकाश बघेल व त्यांचे पत्नीचा उपचार सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी राज शिवजी सिंग, वय ३४ वर्ष, रा. दवलामेटी, म्हॉडा कॉलनी, प्लॉट क्र. ११४, वाडी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे दुचाकीचालक आरोपीविरूध्द कलम २८१,१२५(अ),१०६ भा.न्या.सं., अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे बेलतरोडी :— दिनांक ०८.११.२०२६ चे ०९.४५ वा. चे सुमारास, फिर्यादी प्रशिक अजय लांडगे, वय २६ वर्ष, रा. गली क्र. १९, एकात्मता नगर, जयताळा, नागपूर हे त्यांचे नातेवाईक नामे मनिष प्रल्हाद गणवीर, वय ३८ वर्ष व सौ. सोनाली मनिष गणवीर, वय ३५ वर्ष, रा. प्लॉट क्र. १७८, रेवतीनगर, बेसा, नागपूर यांचे घरी भेटावयास गेले असता, घरातुन कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने, त्यांनी टिनाचे शेडवरुन दुसऱ्या माळ्याचे गॅलरीत जाऊन खिडकीतुन पाहिले असता, बेडरुममध्ये दोघेही सिलींग फॅनला ओढणीचे साहाय्याने गळफास घेतलेल्या स्थितीत दिसुन आले. फिर्यादी यांनी पोलीसांना कळविल्याने, पोलीसांनी मृतदेह पुढील कार्यवाहीस्तव मेडीकल हॉस्पिटल येथे पाठविले आहेत.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. संतोष आंधळे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/—
(अमित देशमुख)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.